Annexure XVI(5),(Vide Article-16.03.01)

22 FEB 2005
8266

महाराष्ट्र वन सेवा वर्ग-१ मधील अधिकाऱ्यांचे
(सहाय्यक वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी)
गोपनीय अहवाल लिहिणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसीआर-२००५/प्र.क्र ९/फ-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ११ जानेवारी, २००५.

परिपत्रक :-

महाराष्ट्र वन सेवेतून भारतीय वन सेवेमध्ये पदोन्नती देण्यासाठी संघ लोकसेवा आयोगाकडून कारवाई करण्यात येते. संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष/सदस्य हे निवड समितीचे अध्यक्ष असतात आणि केंद्र शासनाचा एक प्रतिनिधी निवड समितीचा सदस्य असतो.

महाराष्ट्र वन सेवेतील वर्ग-१ मधील अधिकाऱ्यांना, भारतीय वन सेवेत पदोन्नती देतांना त्यांचे गोपनीय अहवाल विचारात घेतले जातात. गोपनीय अहवाल हे मराठीमध्ये लिहिले असल्यास निवड समितीचे अध्यक्ष व केंद्र शासनाचे प्रतिनिधी यांना इंग्रजी भाषेतील भाषांतरीत गोपनीय अहवाल उपलब्ध करुन देणे राज्य शासनावर बंधनकारक आहे. मराठी भाषेत लिहिलेल्या गोपनीय अहवालाचे इंग्रजी भाषांतर करुन संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली येथे विहीत मुदतीत पाठविणे अडचणीचे होते. त्यामुळे संघ लोकसेवा आयोगास प्रस्ताव सादर करण्यास विलंब होण्याची शक्यता असते. म्हणून महाराष्ट्र वन सेवेतील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल इंग्रजीमध्ये लिहावेत व पुनर्विलोकित करावेत, अशा सर्व संबंधितांना सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ठ. मु. टेंभरे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सि.एम्.लि., नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व अप्पर मुख्य वनसंरक्षक
सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक.
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, सर्व विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम.लि.
मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
अप्पर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक.
सहसचिव/ उप सचिव /विशेष कार्य अधिकारी (फ-१), महसूल व वनविभाग (वनकक्षातील).
सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वनकक्षातील).
निवडनस्ती, फ-७ कार्यासन, महसूल व वनविभाग.

D ranafar-IFS\Notification-1